**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**<u>जाहिर दरपत्रक</u>**

दि.०३/०३/२०१९

**विषय :—** केरसुणी पुरवठा कामाचे दरपत्रक पाठविणेबाबत.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीचे स्वच्छता विभागासाठी एक वर्षभर केरसुणी पुरवठा करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी विहित नमुन्यात दरपत्रक दि. १०/०३/२०१९ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत इकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे.

सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

‘‘केरसुणी पुरवठा कामाचे दरपत्रक’’

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या व अपूर्ण दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रक नमुना, माहिती, अटी व शर्तीची श्री. संत तुकाराम भवन व श्री. संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे पाहावयास मिळतील.

**स्वा/—**

**व्यवस्थापक,**

**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,**

**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**<u>दरपत्रक अर्ज.</u>**

**प्रति,**

**मा. कार्यकारी अधिकारी,**
**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**विषय :—** केरसुणी पुरवठाकामाचे दरपत्रक.

**पूर्ण नाव :—** ________________________________

**पूर्ण पत्ता :—** ________________________________

________________________________

**मोबाईल क्रं.:—** ________________________________

**महोदय,**

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे स्वच्छता विभागासाठी केरसुणी पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | गुणवत्ता | दर (रू.) प्रति नग |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | केरसुणी | उत्तम | |

वरील दर श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. सदर दराने एक वर्षभर उत्तम गुणवत्तेच्या केरसुणींचा पुरवठा करणेस मी बांधील राहील. त्याबाबतचे अटी व शर्ती मान्य असलेचे करारपत्र रू.१००/—च्या स्टॅपपेपरवर करून देण्यास मी तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे सदर मालाचा पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०१९ **पुरवठाधारकाची सही**

<u>सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.</u>

१. पूर्वी केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.
२. स्वतःच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत.

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर

केरसुणी पुरवठा कामाची माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

१. सदर कामासंबंधीचे दरपत्रक स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर पुरवठाधारकाचे पूर्ण नाव व पूर्ण पत्ता नमुद करणे आवश्यक आहे. तसेच लिफाप्यावर केरसुणी पुरवठा करणेकामी दरपत्रक असे नमुद करणे आवश्यक आहे. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठव्यात. उशीरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२. पुरवठाधारकाने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने दरपत्रक मंजुर झालेल्या दिनांकापासून १ वर्षभर केरसुणीचा पुरवठा इकडील मागणीप्रमाणे करणे आवश्यक आहे.

३. पुरवठा करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र** | **मालाचा प्रकार** | **गुणवत्ता** | **अंदाजे आवश्यक वर्षभराचा माल** |
|---|---|---|---|
| १ | केरसुणी | उत्तम | २५०० |

४. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

५. केरसुणी चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

६. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

७. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही

८. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

९. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण दर्शनमंडप विभाग आहे.

१०. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

११. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१२. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१३. सदर कामासाठी अ‍ॅडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१४. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१५. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१६. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रू.१००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र व रू.२,०००/— अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

१७. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१८. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर पुरवठा आदेश कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१९. प्रशासकीय व अन्य कारणास्तव पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

———————‘‘————————